मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | शनिवार, दि. 17 जानेवारी 2026 | पान- 1

# भाजपचा महानगरपालिका निवडणुकीत दणदणीत विजय

## भाजपाचे 84 तर राष्ट्रवादी काँग्रेसचे 37 उमेदवार विजयी

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवत शहराच्या राजकारणात वर्चस्व सिद्ध केले आहे. एकूण १२८ जागांपैकी भाजपाचे ८४ उमेदवार विजयी होत पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवले आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे ३७ उमेदवार विजयी झाले असून, पक्ष दुसऱ्या क्रमांकावर राहिला आहे.

तर शिवसेनेला केवळ ६ जागांवर समाधान मानावे लागले. भाजपच्या या विजयामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील विकासकामांना नवी दिशा मिळेल, असा विश्वास भाजप नेत्यांनी व्यक्त केला आहे. निकालानंतर राजकीय वर्तुळात विविध प्रतिक्रिया उमटत असून, विरोधकांकडूनही निकालाचे आत्मपरीक्षण केले जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत.



### पिंपरी चिंचवड महापालिका पक्षीय बलाबल

| | |
|---|---|
| १२८ नगरसेवक | |
| भाजप | ८४ |
| राष्ट्रवादी | ३७ |
| शिवसेना शिंदे | ०६ |
| अपक्ष | ०१ |

### पिंपरी चिंचवड विजयी उमेदवार

**प्रभाग ०१**

विकास साने – राष्ट्रवादी
सोनम मोरे – भाजप
संगीता ताम्हाणे – राष्ट्रवादी
यश साने – राष्ट्रवादी

**प्रभाग ०२**

सुजाता बोराटे – भाजप
सारिका बोऱ्हाडे – भाजप
राहुल जाधव – भाजप
निखिल बोऱ्हाडे – भाजप

**प्रभाग ०३**

गायकवाड सारिका – भाजप
नितीन काळजे – भाजप
अर्चना सस्ते – भाजप
सचिन तापकीर – भाजप

**प्रभाग क्रमांक ०४**

श्रुती डोळस – भाजप
कृष्णा सुरकुले – भाजप
हिराबाई घुले – भाजप
उदय गायकवाड – भाजप

प्रभाग क्रमांक ०५

भीमाबाई फुगे – राष्ट्रवादी
सागर गवळी – भाजप
कविता भोंगाळे – भाजप
जालिंदर शिंदे – भाजप

**प्रभाग क्रमांक ०६**

देवकर रेखा देवराम – भाजप
लांडगे रवी – भाजप
लांडगे राजश्री – भाजप
लांडगे योगेश – भाजप

**प्रभाग क्रमांक ०७**

विराज लांडे – राष्ट्रवादी
सोनाली गव्हाणे – भाजप
राणी पठारे – भाजप
नितीन लांडगे – भाजप

**प्रभाग क्रमांक ०८**

कांबळे सुहास – भाजप
लोंढे नम्रता – भाजप
वाबळे अश्विनी – राष्ट्रवादी
सहाणे तुषार – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक ०९**

सिद्धार्थ बनसोडे – राष्ट्रवादी
वैशाली घोडेकर – राष्ट्रवादी
सारिका मासुळकर – राष्ट्रवादी
राहुल भोसले – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक १०**

अनुराधा गोरखे – भाजप
कुशाग्र कदम – भाजप
सुप्रिया चांदगुडे – भाजप
तुषार हिंगे – भाजप

**प्रभाग क्रमांक ११**

गायकवाड कुंदन – भाजप
रिटा सानप – भाजप
योगिता नागरगोजे – भाजप
निलेश नेवाळे – भाजप

**प्रभाग क्रमांक १२**

भालेकर प्रवीण – भाजप
शीतल वार्निकर – भाजप
शिवानी नरळे – भाजप
पंकज भालेकर – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक १३**

बाप्पू घोलप – भाजप
अर्चना कारंडे – भाजप
सुलभा उबाळे – शिवसेना
उत्तम केंदळे – भाजप

**प्रभाग क्रमांक १४**

कैलास कुटे – भाजप
वैशाली काळभोर – राष्ट्रवादी
अरुणा लंगोटे – राष्ट्रवादी
प्र मो द कुटे – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक १५**

राजू मिसाळ – भाजप
मोरे शैलजा – भाजप
शर्मिला बाबर – भाजप
अमित गावडे – भाजप

**प्रभाग क्रमांक १६**

तंतरपाळे धर्मपाल – भाजप
ऐश्वर्या तरस – शिवसेना
रेश्मा कातळे – शिवसेना
निलेश तरस – शिवसेना

**प्रभाग क्रमांक १७**

आशा सूर्यवंशी – भाजप
भाऊसाहेब भोईर – राष्ट्रवादी काँग्रेस
पल्लवी वाल्हेकर – भाजप
शेखर चिंचवडे – राष्ट्रवादी काँग्रेस

**प्रभाग क्रमांक १८**

अपर्णा डोके – भाजप
मनिषा चिंचवडे – भाजप
अनंत कोऱ्हाळे – राष्ट्रवादी
सुरेश भोईर – भाजप

**प्रभाग क्रमांक १९**

मधुरा शिंदे – भाजप
श्री. शितल शिंदे – भाजप
सविता आसवानी – राष्ट्रवादी
मंदार देशपांडे – भाजप

**प्रभाग क्रमांक २०**

जितेंद्र ननावरे – राष्ट्रवादी
वर्षा जगताप – राष्ट्रवादी
मनिषा लांडे – राष्ट्रवादी
योगेश बहल – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक २१**

निकिता कदम – राष्ट्रवादी
संदीप वाघेरे – राष्ट्रवादी
प्रियंका कुदळे – राष्ट्रवादी
डब्बू असवानी – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक २२**

नीता पाडळे - भाजप
कोमल काळे - भाजप
विनोद नढे - भाजप
संतोष कोकणे - राष्ट्रवादी काँग्रेस

**प्रभाग क्रमांक २३**

मनिषा पवार – भाजप
तान्हाजी बारणे – भाजप
बारणे योगिता – राष्ट्रवादी
अभिषेक बारणे – भाजप

**प्रभाग क्रमांक २४**

विश्वजीत बारणे – शिवसेना
शालिनी गुजर – अपक्ष
माया बारणे – राष्ट्रवादी
निलेश बारणे – शिवसेना

**प्रभाग क्रमांक २५**

राहुल कलाटे ( भाजप )
कुणाल व्हावळकर ( भाजप + आर पी आय )
रेश्मा भुजबळ - भाजप
श्रुती वाकडकर - भाजप

प्रभाग क्रमांक २६

ॲड. विनायक गायकवाड – भाजपा
आरती सुरेश चौंधे – भाजपा
स्नेहा रणजीत कलाटे – भाजपा
संदीप अरुण कस्पटे – भाजपा

**प्रभाग क्रमांक २७**

बाबासाहेब त्रिभुवन – भाजप
सविता खुळे – भाजप
अर्चना तापकीर – भाजप
सागर कोकणे – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक २८**

शत्रुघ्न सिताराम काटे – भाजप
अनिता संदीप काटे – भाजप
कुंदा संजय भिसे – भाजप
विठ्ठल उर्फ नाना काटे – राष्ट्रवादी

**प्रभाग क्रमांक २९**

रविना अंघोळकर – भाजप
शकुंतला दराडे – भाजप
शशिकांत कदम – भाजप
शाम जगताप – भाजप

**प्रभाग क्रमांक ३०**

राजू बनसोडे – राष्ट्रवादी
प्रतीक्षा लांघी जवळकर – राष्ट्रवादी
स्वाती उर्फ माई काटे – राष्ट्रवादी
संजय काटे – भाजप

**प्रभाग क्रमांक ३१**

दीप्ती कांबळे – राष्ट्रवादी
ज्ञानेश्वर जगताप – भाजप
पल्लवी जगताप – भाजप
नवनाथ जगताप – भाजप

**प्रभाग क्रमांक ३२**

तृप्ती कांबळे – भाजप
हर्षल ढोरे – भाजप
उज्वला ढोरे – राष्ट्रवादी
प्रशांत शितोळे – भाजप

# महापालिका निवडणूकीत 57.71 टक्के मतदान

## सकाळपासून संध्याकाळपर्यंत मतदानात वाढ; सरासरी 57.71 टक्के मतदानाची नोंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने वयोवृद्ध, महिला आणि दिव्यांग तसेच इतर मतदारांसह नवोदित मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावत लोकशाहीच्या महाउत्सवात उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला. सकाळी ७.३० वाजता सुरू झालेली मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततापूर्ण वातावरणात पार पडली असून सुमारे सरासरी ५७.७१ टक्के मतदान झाले आहे, अशी माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिली आहे.

मतदारसंघातील दर दोन तासांची सरासरी मतदान टक्केवारी..

८ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयअंतर्गत सर्व मतदान केंद्रांवर मतदारांनी सकाळपासूनच मतदानासाठी उस्फुर्त प्रतिसाद दिला. सकाळी ९.३० वाजेपर्यंत ६.५६ टक्के मतदान झाले.




तर सकाळी ११.३० वाजेपर्यंत मतदानाच्या प्रमाणात वाढ होऊन ते १६.३ टक्के इतके झाले. दुपारी १.३० वाजेपर्यंत मतदानाचे प्रमाण २८.१५ टक्के इतके झाले. त्यानंतर दुपारी ३.३० वाजेपर्यंत सरासरी ४०.५ टक्के मतदान पार पडले. सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत सरासरी ५७.७१ टक्के मतदान पुर्ण झाले. सायंकाळच्या सत्रात मतदार अधिक संख्येने मतदान केंद्राकडे मतदानासाठी येत होते.

**प्रभागनिहाय मतदान टक्केवारी..**

प्रभाग क्र. १ – ६०.६१ टक्के
प्रभाग क्र. २ – ६४.९१ टक्के
प्रभाग क्र. ३ – ६०.९७ टक्के
प्रभाग क्र. ४ – ५७.०८ टक्के
प्रभाग क्र. ५ – ६१.५८ टक्के
प्रभाग क्र. ६ – ५५.७२ टक्के
प्रभाग क्र. ७ – ५८.३७ टक्के
प्रभाग क्र. ८ – ६०.१९ टक्के
प्रभाग क्र. ९ – ५६.९१ टक्के
प्रभाग क्र. १० – ४९.५४ टक्के
प्रभाग क्र. ११ – ५४.७१ टक्के
प्रभाग क्र. १२ – ६५.१४ टक्के
प्रभाग क्र. १३ – ५४.२७ टक्के
प्रभाग क्र. १४ – ५३.४४ टक्के
प्रभाग क्र. १५ – ५५.५६ टक्के
प्रभाग क्र. १६ – ६२.४५ टक्के
प्रभाग क्र. १७ – ६०.०४ टक्के
प्रभाग क्र. १८ – ५६.१८ टक्के
प्रभाग क्र. १९ – ४९.२२ टक्के
प्रभाग क्र. २० – ५५.४२ टक्के
प्रभाग क्र. २१ – ५६.७६ टक्के
प्रभाग क्र. २२ – ६०.२८ टक्के
प्रभाग क्र. २३ – ६३.३७ टक्के
प्रभाग क्र. २४ – ६१.७२ टक्के
प्रभाग क्र. २५ – ६०.४८ टक्के
प्रभाग क्र. २६ – ५५.३० टक्के
प्रभाग क्र. २७ – ६१.०१ टक्के
प्रभाग क्र. २८ – ५४.८८ टक्के
प्रभाग क्र. २९ – ५४.५९ टक्के
प्रभाग क्र. ३० – ५४.२२ टक्के
प्रभाग क्र. ३१ – ५२.०० टक्के
प्रभाग क्र. ३२ – ५७.५९ टक्के

**मतदारांसाठी सेल्फी पॉइंट्स..**

मतदान जनजागृतीबाबत सुविचार, घोषवाक्ये, आकर्षक छायाचित्रे अशी सजावट करून मतदान केंद्रांवर सेल्फी पॉइंट्स तयार करण्यात आले होते. याठिकाणी मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्यानंतर सेल्फी काढली. यामध्ये युवा मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणावर दिसून आली.

### कंट्रोल रुमद्वारे लक्ष..

» मतदानाच्या संपुर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सर्व मतदान केंद्रे वेब कास्टिंगद्वारे जोडण्यात आली होती. महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवन येथे कंट्रोल रूम स्थापित करण्यात आला होता. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर संपुर्ण प्रक्रियेवर कंट्रोल रूममधून बारकाईने लक्ष ठेवून होते. याद्वारे मतदान केंद्राशी समन्वय साधून नियंत्रण करण्यात येत होते. यावेळी मुख्य निवडणूक निरीक्षक सुधांशू राय आणि निवडणूक निरीक्षक सरिता नरके यांनी देखील मुख्य नियंत्रण कक्षाची पाहणी करून माहिती घेतली.

# भाजपाचा महाविजय स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकरांना समर्पित

## आमदार महेश लांडगे यांची भावूक प्रतिक्रिया; पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाला निर्विवाद बहुमत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आज जाहीर होत असलेल्या निकालांकडे पाहता, पिंपरी-चिंचवडकरांनी पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टीवर ठाम विश्वास व्यक्त केला असून, भाजपचा एकहाती महापौर बसवण्याचा मार्ग मोकळा झाला. स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकरांन आम्ही साद घातली होती. त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व आणि भारतीय जनता पार्टीच्या पक्षश्रेष्ठींच्या मार्गदर्शनाखाली मिळालेला हा महाविजय स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकरांना समर्पित आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक- 2026 च्या



निमित्ताने राजकीय वातावरण तापले होते. मागील काही दिवसांपासून शहरात प्रचाराची जोरदार रणधुमाळी सुरू होती. आज निकालावरुन पिंपरी-चिंचवडची जाणती व स्वाभिमानी जनता भाजपाच्या पाठीशी ठामपणे उभी राहिल्याचे स्पष्ट होत आहे.

या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला 128 पैकी 85 जागांवर विजय मिळाला आहे. प्रमुख प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला 36, शिवसेना शिंदे गटाला 6 आणि अपक्ष 1 असे संख्याबळ आहे. भाजपा आणि शिंदे गट युती झाल्यास भाजपा महायुतीने 91 जागांवर विजय मिळवल्याचे स्पष्ट होते.

यावेळी बोलताना आमदार महेश लांडगे म्हणाले की, "देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे सक्षम, दूरदर्शी नेतृत्व माननीय देवेंद्रजी फडणवीस यांच्यावर विश्वास ठेवत पिंपरी-चिंचवडकरांनी भारतीय जनता पार्टीला स्पष्ट आणि निर्णायक कौल दिला आहे. हा कौल म्हणजे विकासकामांना, प्रामाणिक प्रशासनाला आणि जनहिताला दिलेली ठाम पोचपावती आहे हा विजय केवळ भारतीय जनता पार्टीचा नाही, तर हा विजय पिंपरी-चिंचवडमधील प्रत्येक स्वाभिमानी नागरिकाचा आहे.

तसेच, भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, निवडणूक प्रमुख तथा आमदार शंकर जगताप, विधान परिषद आमदार उमा खापरे, विधान परिषद आमदार अमित गोरखे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, नेते आणि मार्गदर्शक यांच्यासह भाजपा परिवारातील विविध संस्था, संघटना यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हा महाविजय शक्य झाला. या विचारांच्या आणि विकासाच्या लढाईमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान दिलेल्या प्रत्येकाचा मी ऋणी आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

### भाजपा कार्यकर्त्यांचे मानले आभार...

» तसेच पक्षाच्या प्रत्येक कार्यकर्त्याने, पदाधिकाऱ्याने आणि नेत्यांनी प्रामाणिकपणे केलेल्या मेहनतीचा हा सन्मान आहे. घराघरात जाऊन केलेला संवाद, लोकांशी निर्माण केलेला विश्वास आणि संघटनात्मक ताकदीमुळेच आज हे यश शक्य झाले आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण, नियोजित आणि शाश्वत विकासासाठी भारतीय जनता पार्टी पूर्णतः कटिबद्ध असून, नागरिकांनी दाखवलेला हा विश्वास अधिक जबाबदारीने जपला जाईल. महानगरपालिकेच्या माध्यमातून विकासकामांचा वेग वाढवून पिंपरी-चिंचवडला देशातील आदर्श शहर बनवण्याचा संकल्प भाजप निश्चितपणे पूर्ण करेल, असा विश्वास आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला.

# तुतारीची 'वेळ' चुकली, पवारांची युती फसली

## महापालिकेत अजित पवार आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने आघाडी केली होती. मात्र दोन्ही पक्षांना अपेक्षित यश मिळू शकलेले नाही.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील २९ महानगरपालिकांचे निकाल जाहीर झाले आहेत. मुंबईसह अनेक महापालिकांमध्ये भाजपा-शिवसेनेने (शिंदे) आघाडी घेतली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाशी युती केली होती. युतीमध्ये असताना त्यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजपावर भ्रष्टाचाराचे आरोपही केले होते. मात्र प्रचारातील आरोप-प्रत्यारोपाचा मतपेटीत फारसा लाभ झालेला नसल्याचे दिसत आहे.

१६५ नगरसेवक असलेल्या पुणे महानगरपालिकेत भाजपाने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. तर अजित पवार आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीला सन्मानजनक जागा मिळू शकलेल्या नाहीत. त्यामुळे पुण्यात एकत्र येऊनही घड्याळ आणि तुतारीला मतदारांनी नाकारल्याचे दिसत आहे.

पिंपरी चिंचवडमध्येही हीच परिस्थिती आहे. १२८ नगरसेवक असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाने बहुमतापेक्षाही अधिक जागांवर आघाडी घेतली आहे. त्याखाली अजित पवारांना जागा मिळाल्याचे दिसत आहे. तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला इथे फारशी चमक दाखवता आलेली नाही.

आतापर्यंत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवारांना सुनावले होते. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवारांमध्ये तू तू मै मै झाल्याचे बघायला मिळाले.'काही जणांना कंठ फुटल्याचा टोला फडणवीस यांनी अजितदादांना उद्देशून लगावला. त्यावर नऊ वर्षाने निवडणूक जाहीर झाल्याने कंठ फुटल्याचे प्रत्युत्तर अजित पवारांनी मुख्यमंत्र्यांना दिले.

पुण्याची सूत्रे अजित पवारांना स्वत:कडे हवी आहेत. भाजप अजित पवारांचे पुण्यातील वर्चस्व मान्य करायला तयार नाही. त्यातून हा वाद उदभवला असल्याचे बोलले जाते. पुण्याच्या आसपासच्या परिसरात भाजपला पक्ष वाढवायचा आहे. यापूर्वी पश्चिम महाराष्ट्रात भाजपवर मर्यादा होत्या. त्यासाठी अन्य पक्षातील नेत्यांना बरोबर घेऊन पक्ष वाढीचे भाजपाचे प्रयत्न सुरू होते. यातूनच अजित पवार आणि भाजपमध्ये वर्चस्वाचा वाद सुरू झाला. पुणे वा पिंपरी – चिंचवड ताब्यात आल्यास राजकीय ताकद वाढते हे लक्षात घेऊनच अजित पवारांनी जोर लावला आहे.




### अजित पवारांकडून भाजपावर थेट टीका

» महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गट समोरासमोर आलेले पाहायला मिळाले. महायुतीत भाजप, शिवसेना शिंदे आणि अजित पवार गट कोल्हापूर वगळता तिघेही एकत्र कुठेच लढलेले नाहीत. काही ठिकाणी दोन पक्षांची युती झाली आहे. भाजप आणि शिंदे गटात कुरघोडीचे राजकारण सुरू असले तरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपवर थेट टीका वा आरोप करण्याचे टाळले. अजित पवारांनी पुण्यात मात्र भाजपवरच तोफ डागली. पुणे व पिंपरी – चिंचवडमध्ये भाजपच्या सत्तेच्या कार्यकाळात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला. त्याची भाजपमधून प्रतिक्रिया उमटली.

### वर्चस्वाचा वाद

» पुण्याची सूत्रे अजित पवारांना स्वत:कडे हवी आहेत. भाजप अजित पवारांचे पुण्यातील वर्चस्व मान्य करायला तयार नाही. त्यातून हा वाद उदभवला असल्याचे बोलले जाते. पुण्याच्या आसपासच्या परिसरात भाजपला पक्ष वाढवायचा आहे. यापूर्वी पश्चिम महाराष्ट्रात भाजपवर मर्यादा होत्या. त्यासाठी अन्य पक्षातील नेत्यांना बरोबर घेऊन पक्ष वाढीचे भाजपाचे प्रयत्न सुरू होते. यातूनच अजित पवार आणि भाजपमध्ये वर्चस्वाचा वाद सुरू झाला. पुणे वा पिंपरी – चिंचवड ताब्यात आल्यास राजकीय ताकद वाढते हे लक्षात घेऊनच अजित पवारांनी जोर लावला आहे.

### फडणवीस यांचा टोला

» आतापर्यंत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवारांना सुनावले होते. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवारांमध्ये तू तू मै मै झाल्याचे बघायला मिळाले. 'काही जणांना कंठ फुटल्याचा टोला फडणवीस यांनी अजितदादांना उद्देशून लगावला. त्यावर नऊ वर्षाने निवडणूक जाहीर झाल्याने कंठ फुटल्याचे प्रत्युत्तर अजित पवारांनी मुख्यमंत्र्यांना दिले.

# जिल्हा परिषद निवडणुकीसाठी भाजपचा स्वबळाचा नारा

## आता आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपने अजित पवारांना धक्का देण्याची तयारी केली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील महानगरपालिकांचा निकाल जाहीर होत आहे, या निकालात भाजपने दणदणीत विजय मिळवला आहे. मुंबई पुण्यासह राज्यातील महत्त्वाच्या महापालिकांवर भाजपचा झेंडा फडकण्याची शक्यता आहे. या निकालानंतर आता लगेच जिल्हा परिषद निवडणुकांची रणधुमाळी सुरू होणार आहे. आजपासूनच उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये भाजपने अजित पवारांचा गेम केला आहे. या दोन्ही ठिकाणी भाजपचा महापौर बसणार हे जवळपास निश्चित झाले आहे. यानंतर आता भाजपने अजित पवारांना आणखी मोठा धक्का दिला आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

महापालिकेच्या निवडणुकीत राज्यात सत्तेत असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीला भाजपने दूर ठेवले होते. अजित पवारांच्या पक्षाने जवळपास सर्वच ठिकाणी स्वतंत्र निवडणूक लढवली होती. मात्र यात राष्ट्रवादीला फारसे यश मिळालेले नाही. त्यानंतर आता आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपने अजित पवारांना धक्का देण्याची तयारी केली आहे. पुण्यातील जिल्हा परिषद निवडणूक भाजपने स्वबळावर लढण्याची भाषा केली आहे.

पुणे जिल्हा परिषद निवडणुकीसाठी भाजपाने स्वबळाचा निर्धार व्यक्त करत, पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर आज भारतीय जनता पक्षाची महत्त्वाची बैठक माझ्या व केंद्रीय मंत्री मुरलीधरजी मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाली. यावेळी आगामी निवडणुकीची रणनिती, संघटनात्मक मजबुती तसेच उमेदवार निवडीसंदर्भात सविस्तर व सकारात्मक चर्चा झाली. पुणे जिल्हा परिषदेची निवडणूक भारतीय जनता पक्षाने स्वबळावर लढवावी, असा ठाम व एकमुखी सूर या बैठकीत उमटला. या बैठकीस पुणे उत्तर व पुणे दक्षिणचे जिल्हाध्यक्ष, वरिष्ठ नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### स्वबळाचा निर्धार व्यक्त

» याबाबत मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोशल मीडियावर माहिती दिली आहे. चंद्रकांत पाटील यांनी X वर लिहिले की, पुणे जिल्हा परिषद निवडणुकीसाठी भाजपाने स्वबळाचा निर्धार व्यक्त करत, पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर आज भारतीय जनता पक्षाची महत्त्वाची बैठक माझ्या व केंद्रीय मंत्री मुरलीधरजी मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाली.

# जिल्हा परिषद–पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी सुरू

## 16 जानेवारीपासून उमेदवारी अर्ज प्रक्रिया; 5 फेब्रुवारीला मतदान

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया शुक्रवार (दि. 16) पासून सुरू होत आहे. हे अर्ज केवळ 'ऑफलाईन' पद्धतीनेच भरता येणार आहेत. जिल्ह्यातील 13 तालुक्यांच्या मुख्यालयी अर्ज दाखल करण्याची व्यवस्था प्रशासनाच्या वतीने करण्यात आली आहे. या प्रक्रियेबरोबरच सुमारे चार वर्षे लांबलेल्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू होत असल्याने अनेक इच्छुकांनी निश्वास सोडला आहे.

महापालिका निवडणुकांची रणधुमाळी संपताच राजकीय नेत्यांना आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी लक्ष केंद्रित करावे लागणार असून 5 फेबवारीपर्यंत आता त्यांना उसंत मिळण्याची शक्यता दिसत नाही. प्रचंड संख्येने असलेल्या इच्छुकांच्या गर्दीमुळे उमेदवारीवाटपाचे मोठे आव्हान नेते मंडळींना पेलावे लागणार आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुणे जिल्हा परिषदेच्या 73 सदस्य आणि 146 पंचायत समिती सदस्यांच्या निवडणुकीसाठी 5 फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया शुक्रवार (दि. 16)पासून सुरू होईल. 21 जानेवारी ही अर्ज भरण्याची अंतिम मुदत असून, दुपारी 3 वाजेपर्यंत अर्ज स्वीकारले जातील. 18 जानेवारी रोजी रविवारची सुटी असल्याने त्या दिवशी उमेदवारअर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

उमेदवारी अर्जाचा नमुना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आला आहे. इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी अर्ज व शपथपत्रात संपूर्ण माहिती भरून तो संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करावा. जिल्ह्यातील 13 तालुक्यांच्या मुख्यालयी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. 22 जानेवारी रोजी नामनिर्देशन अर्जांची छाननी करण्यात येणार असून, त्यावर निर्णय घेतला जाईल. वैध ठरलेल्या नामनिर्देशन अर्जांची यादी प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर 27 जानेवारीपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. 25 व 26 जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने त्या दिवशी अर्ज मागे घेता येणार नाहीत. 27 जानेवारी रोजी दुपारी 3.30 नंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाईल. 5 फेब्रुवारी रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 वाजेपर्यंत मतदान होणार असून, 7 फेब्रुवारी रोजी मतमोजणी होणार आहे.




### ...असे आहे, सभापतीचे आरक्षण

» राजगड : सर्वसाधारण महिला » मुळशी : सर्वसाधारण महिला » भोर : सर्वसाधारण महिला » पुरंदर : नागरिकांचा मागास प्रवर्ग » आंबेगाव : सर्वसाधारण » मावळ : नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला » बारामती : सर्वसाधारण » हवेली : सर्वसाधारण » शिरूर : नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला » दौंड : नागरिकांचा मागास प्रवर्ग » जुन्नर : अनुसूचित जमाती महिला » खेड : सर्वसाधारण महिला » इंदापूर : अनुसूचित जाती

### उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उपलब्ध ठिकाणे

- » जुन्नर : पंचायत समिती कार्यालय, जुन्नर
- » आंबेगाव : तहसील कार्यालय, घोडेगाव
- » शिरूर : नवीन प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालय शिरूर
- » खेड : उपविभागीय अधिकारी कार्यालय, खेड यांचे कार्यालय, वाडा रोड, राजगुरूनगर
- » मावळ : तहसील कार्यालय, वडगाव मावळ
- » मुळशी : तहसील कार्यालय, मुळशी, पौड
- » हवेली : सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, आंबेगाव बुद्रुक, पुणे
- » दौंड : नवीन प्रशासकीय इमारतर, तहसील कार्यालय, दौंड
- » पुरंदर : नवीन प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालय, पुरंदर, सासवड,
- » वेल्हे : तहसील कार्यालय, राजगड, वेल्हे बुद्रुक,
- » भोर : तहसील कार्यालय, राजवाडा चौक, भोर
- » बारामती : तहसील कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, बारामती
- » इंदापूर : नवीन प्रशासकीय इमारत, तहसील कार्यालय, इंदापूर

# गणेश निकुडे पुन्हा एकदा उपनगराध्यक्ष; 'या' दोघांची नगरसेवकपदावर स्वीकृत पदी वर्णी

## अजित पवारांच्या आश्वासनाची पूर्तता: टप्प्याटप्प्याने कार्यकर्त्यांना मिळणार संधी; जेजुरी शहराध्यक्ष रमेश लेंडे यांचा महत्त्वाचा खुलासा.

**पुणे | प्रतिनिधी**

जेजुरी नगरपरिषदेच्या निवडणुकीनंतर (दि.१५) नगरपालिका सभागृहात घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेत उपनगराध्यक्षपदी गणेश मच्छिंद्रनाथ निकुडे यांची तर स्वीकृत नगरसेवक पदी रामकृष्ण (समीर) मोरे, परशुराम (प्रशांत) लाखे यांची एकमताने निवड केली.पीठासीन अधिकारी नगराध्यक्ष जयदीप बारभाई तर निवडणूक निर्णय अधिकारी परिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी काम पाहिले.

नगरपरिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी (अजित पवार) चे नगराध्यक्षपदासह १७ नगरसेवक व नगरसेविका निवडून आले आहेत.१ अपक्ष तर २ भाजपचे सदस्य आहेत. सलग चौथ्यांदा निवडून आलेल्या गणेश निकुडे यांनी राष्ट्रवादीची बांधणी करत समाजातील विविध घटकांना पक्षाच्या प्रवाहात आणत उमेदवारी देत सामाजिक सलोखा जपण्याचा प्रयत्न करीत जेजुरी नगरपालिकेत निर्विवाद बहुमत मिळवण्यात मोलाची कामगिरी केली.

त्यामुळे त्यांना पुन्हा उपनगराध्यक्षपदाची संधी देण्यात आल्याचे बोलले जाते. मागील पाच वर्षे त्यांनी सलग उपनगराध्यक्षपद भूषवले आहे. तर बहुमतामुळे २ स्वीकृतपदे राष्ट्रवादीच्या पारड्यात आली. या पदावर मोरे, लाखे यांची वर्णी लागली आहे. यावेळी नगराध्यक्ष जयदीप बारभाई यांच्यासह नगरसेवक योगेश जगताप, स्वप्नील हरपळे, शिवाजी जगताप,योगेश खोमणे, अस्लम पानसरे, गणेश डोंबे, तानाजी खोमणे,

कृष्णा कुदळे, नगरसेविका भक्ती कोरपड, प्रज्ञा राऊत, अमिना पानसरे, मेघा उबाळे, स्नेहल भालेराव, स्वरूपा खोमणे, मोनिका घाडगे, योगिता दोडके, मंदा बयास, नीलम सातभाई, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष रमेश लेंडे, युवक अध्यक्ष सनी झगडे, प्रचारप्रमुख संदीप जगताप, कार्यकर्ते, पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. निवडीनंतर फटाक्यांची आतषबाजी, भंडाऱ्याची उधळण करीत जल्लोष करण्यात आला.



### अन्य कार्यकर्त्यांनाही संधी मिळणार

» निवडणुकीपूर्वी जाहीर सभेमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जाहीर सभेमध्ये ज्या कार्यकर्त्यांना व पदाधिकारी यांना स्वीकृत सदस्यपदाचे आश्वासन देण्यात आले होते. त्याचे पालन होणार असून टप्या- टप्याने कार्यकर्त्यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी देण्यात येणार असल्याचे राष्ट्रवादी शहराध्यक्ष रमेश लेंडे, प्रचारप्रमुख संदीप जगताप यांनी सांगितले.